MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

maharashtraaarambh@gmail.com

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## एकनाथ खडसेंनी पक्षात राहून चोऱ्या केल्या, त्यामुळंच त्यांना पक्षानं हाकलून दिलं; महाजनांचा हल्लाबोल

जळगांव : एकनाथ खडसे यांचा राजीनामा हा दाऊदचा आरोप झाला म्हणून घेतला नव्हता. तर पक्षात राहून त्यांनी चोऱ्या आणि आर्थिक घोटाळे केले होते, त्यामुळं त्यांना पक्षाने हाकलून दिल्याचे वक्तव्य भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी केलं. दाऊदच्या संभाषणामुळं आपल्याला पक्षातून काढलं असं एकनाथ खडसेंनी समजण्याची गरज नसल्याचे महाजन म्हणाले. एकनाथ खडसे ज्या फोटोवरुन आरोप करत आहेत ते दहा वर्षांपूर्वीचे कुंभमेळा प्रसंगी मुस्लिम धर्मगुरुंच्या घरी असलेल्या विवाह सोहळ्यातील फोटो असल्याचे महाजन म्हणाले. सध्या एकनाथ खडसे हे आता मानसिक तणावात असल्याचे महाजन म्हणाले.

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -८८ | रविवार दि.१७ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -88 | SUNDAY DT.17 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

## लवकरच आता पोलीसांकडून जाळपोळीतील मास्टरमाईंड असणाऱ्या

# मानाच्या गणपतीची मिरवणुक?

## बीड पोलिसाकडून मिरवणूक काढण्याची शक्यता तो मानकरी कोणं?

## जिल्हयात 'आगीचे तांडव' पसरवणाऱ्या 'उंटावरच्या शहाण्याची' बिनभाड्याच्या खोलीत लवकरच रवानगी होण्याची शक्यता!



राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी पप्पू शिंदे चा उल्लेख करत कोणाकडे बोट कोणाकडं केलं आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राग का आला.यावेळी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी या अगोदर सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये येऊन काही दिवसापूर्वी पत्रकार परिषदेमध्ये बीड जिल्ह्यातील जाळपोद्यांगलीमध्ये सत्तेतील दोन माणसे असल्याचे सांगितले होते या अगोदर आमदार संदीप शिरसागर सुद्धा यांनी सत्तेतील दोन माणस आहेत असे सांगितले आहे नेमके हे दोन माणसे कोण आहेत हे राष्ट्रवादीच्या नेत्यांनी नाव घेऊन बोलायला हवे आमदार संदीप क्षीरसागर यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात बीड जाळपोळीचा मुद्दा मांडला पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर हे बीड जाळपोळीतील तपास योग्य पद्धतीने करत आहेत

माजलगाव व बीड शहरातील जाळपोळीचा भडका हिवाळी अधिवेशनात झाला. यात लक्षवेधी झाल्यानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या, त्याप्रमाणे शनिवारी लगेच पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी जिल्ह्यातील सर्व ठाणेदार, अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. आंदोलनातील गुन्ह्यात जे आरोपी आहेत ते शोधून त्यांना अटक करा. प्रत्येक गुन्ह्यांचा लवकरात लवकर निपटारा करा, अशा सूचना पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.मराठा आरक्षणाच्या मुद्द्द्यावरून ३० ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यात जाळपोळ व दगडफेकीसारख्या गंभीर घटना घडल्या. हा प्रकार राज्यभर गाजला आणि सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याच प्रकरणावर बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांनीशुक्रवारी लक्षवेधी केली.

### जाळपोळीतील 'कळीचा नारद' कोण? दीड महिन्यांपासून पडद्याआडचा 'गप्पीमासा' जाळ्यात अडकणार?

### बीड जिल्हा जाळपोळीतील मास्टर कोण लवकर एस आय टी चौकशीत समोर येण्याची शक्यता?





त्यानंतर जयंत पाटील यांनीही पाठबळ दिले. याला उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देताना पोलिसांची बाजू लावून धरली याप्रकरणातील २७८ आरोपींना अटक केली असून, जे फरार आहेत त्यांचाही शोध सुरू असल्याचे सांगितले. तसेच चौकशीसाठी दोन दिवसांत एसआयटी स्थापन करू, अशी ग्वाहीही दिली होती. दरम्यान, बीडचे हे प्रकरण अधिवेशनात गाजल्यानंतर बीडचे - पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी शनिवारी तातडीने अधिकाऱ्यांची बैठक बोलावली.ओळख पटवा. ज्यांची ओळख पटूनही अद्याप अटक नाहीत, त्यांना तातडीने शोधून काढा. या सर्व दाखल गुन्ह्यांचा निपटारा करून अहवाल द्या, अशा सूचना पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.आरक्षण व इतर मागण्यांसाठी विविध समाजाने आंदोलने केली होती. यात जाळपोळ, दगडफेकही झाली. याच गुन्ह्यांचा आढावा घेतला. यातील आरोपी शोधून त्यांना अटक करा आणि गुन्ह्यांचा निपटारा करा. तसेच २३ डिसेंबरला होणाऱ्या इशारा सभेच्या अनुषंगाने उपद्रवी लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशा सूचना दिल्या आहेत. सभेच्या बंदोबस्ताचे नियोजनही सुरू आहे. - नंदकुमार ठाकूर, पोलिस अधीक्षक, बीड

### एसआयटी चौकशीत सर्व 'अंडीपिल्ली' बाहेर येण्याची शक्यता? अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्यांचे धाबे दणाणले!

### माजलगाव शहर, शिवाजीनगरवर विशेष लक्ष

माजलगाव शहरात आ. प्रकाश सोळंके आणि बीड शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाणे हद्दीत आ. संदीप क्षीरसागर यांचे घर जाळण्यात आले. त्यामुळे या ठाणेदारांची विशेष हजेरी एसपींनी घेतली. जे फरार आरोपी आहेत, त्यांना तातडीने अटक करा. यासाठी विशेष पथके नियुक्त करा, अशा सूचनाही ठाकूर यांनी दिल्या.

### ३५० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई?

२३ डिसेंबरला जरांगे-पाटील यांची निर्णायक सभा होत आहे त्या आधीच पोलिसांनी उपद्रवी असलेल्या जवळपास ३५० लोकांची यादी ठाणेनिहाय तयार केली आहे या सर्वांवर प्रतिबंधात्मक कारवाया करा, अशा सूचनाही पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिल्याचे सांगण्यात आले.



## कासारी गावात आढळला बिबट्या

### गावच्या परिसरात आतापर्यंत पहिल्यांदा दिसला बिबट्या



केज तालुक्यातील कासारी शिवारात आज सायंकाळी सव्वा सात वाजताच्या दरम्यान गायरान परिसरात एक बिबट्या नागरिकांना दिसला. गावातील सर्व लोक सतर्क असून वन विभागाच्या अधिकाऱ्याने देखील लक्ष देण्याची गरज आहे. तसं कासारी गाव पाहायला गेलं तर केज तालुक्यात येत. मात्र त्याला धारूर तालुका पोलीस स्टेशन आहे. कासारीचा संपूर्ण परिसर हा धारूर पोलीस ठाण्याअंतर्गत आहे. वन विभाग धारूर या ठिकाणी असून वन विभागाने आता लक्ष देण्याची गरज आहे. कासारी गावातील अनेक लोक वस्ती तांड्यावर राहतात. पशुधन आहे त्याचबरोबर पिकांना पाणी देण्यासाठी अनेक शेतकरी शेतात असतात कारण मध्यरात्री लाईट येत असल्याने बोर विद्युत विहिरीतले मोटर चालू करण्यासाठी शेतकरी मध्यरात्रीच शेतात असतो. त्यामुळे कासारी गावातील शेतकऱ्यांच्या मनामध्ये सध्या तरी भीती निर्माण झालेली आहे. वेळीच शासन प्रशासनाने पावले उचलली गेली पाहिजेत. याच परिसरात रानडुक्कर देखील हरण देखील मोठ्या प्रमाणावर आहेत. कासारी ग्रामपंचायत च्या माध्यमातून आम्ही गावातील लोकांची शंभर टक्के काळजी घेतच आहेत मात्र शासन प्रशासन सुद्धा नागरिकांची काळजी घेणे गरजेचे आहे.

## नागपुरातील एक्सप्लोझिव्ह कारखान्यात भीषण स्फोट

# ९ ठार, ३ बचावले, आकड़ा वाढण्याची भीती, सरकारकडून ५ लाखांची मदत जाहीर

नागपुर /प्रतिनिधी

नागपुरातील एका मोठ्या एक्सप्लोझिव कारखान्यात स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये ९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३ जण बचावल्याची प्राथमिक माहिती आहे. मृतांमध्ये ६ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश आहे. तर मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर कंपनीतील कामगाव त्यांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली असून मोठा आक्रोश सुरू आहे.




रविवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारात हा स्फोट झाला. कंपनीत दारूगोळा बनवण्याचे काम सुरू असताना हा स्फोट झाल्याची माहिती मिळाली आहे. नागपूरच्या बाजारगाव गावात सोलर एक्सप्लोझिव्ह कंपनीत स्फोट झाला आहे.

### सरकारकडून मदत जाहीर

दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या नातेवाईकांना सरकारकडून ५ लाखांची मदत जाहीर केली आहे. या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी राज्य सरकार ठामपणे उभे असल्याचे आश्वासन त्यांनी मृतांच्या कुटुंबियांना दिले आहे.

### कारखान्यात जीवितहानी झाल्याची भीती

या कारखान्यात मोठ्या प्रमाणावर दारूगोळा तसेच रसायने असल्यामुळे यात जीवितहानी झाल्याची भीती वर्तवण्यात येत आहे. या स्फोटाची तीव्रता नेमकी किती होती याची अद्याप माहिती समोर येऊ शकलेली नाही. मात्र, एक इमारत उध्वस्त झाल्याची माहिती आहे. पोलिसांचे पथक तेथे पोहोचले आहे. तर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली आहे.

# आंदोलनाची घोषणा मनोज जरांगेंनी पुढे ढकलली

## २३ डिसेंबरला होणाऱ्या सभेत पुढील आंदोलनाची दिशा जाहीर करणार


**जालना - मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची पुढील दिशा आंतरवाली सराटी गावात आज ठरवली जाणार होती. मात्र, याबाबतचा निर्णय आता म्हणून मनोज जरांगे यांनी पुढे ढकलला आहे. बीड जिल्ह्यात २३ डिसेंबर रोजी होणाऱ्या सभेत पुढील आंदोलनाची दिशा जाहीर केली जाणार असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या अधिवेशनात मराठा आरक्षणाबाबत भूमिका मांडणार आहे. त्यामुळे आधी त्यांची भूमिका कळली पाहिजे यासाठी हा निर्णय घेण्यात असल्याचे देखील जरांगे म्हणाले आहे.**

मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करावे ही आपली मागणी असून सरकारला २४ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यात एक तासही कमी होणार नाही. ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत, याचा अर्थ मराठा ओबीसीमध्ये आहे. १९६७ पूर्वी मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे मराठा समाजाला आधी आरक्षण द्यायला हवे होते. ओबीसी आरक्षण त्यानंतर देण्यात आले. जर मराठ्यांच्या नोंदी सापडल्या असतील तर



मराठा समाजाला आरक्षण देण्यापासून देव सुद्धा रोखू शकत नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी आज आंतरवाली सराटीतून दिला आहे.

दरम्यान मनोज जरांगे पाटील म्हणाले की, २४ तारखेनंतर दिवस वाढवून देणार नाही. आता माघार घेणार नाही. कायदेतज्ज्ञांच्या सल्ल्याने सरकारने २४ डिसेंबरपर्यंत वेळ मागून घेतली आहे. जे ठरलंय त्यानुसार २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण द्यावे लागेल. मराठा समाज मागास सिद्ध झाला आहे. त्यामुळे मराठ्यांचा सरसकट ओबीसींमध्ये समावेश करा. नोंदी सापडल्याने ओबीसीतून आरक्षण देण्यास कुणीही रोखू शकत नाही. ओबीसींच्या लेकरांचे आम्ही काढून घेत नाही. मराठा आणि ओबीसी समाज आधीपासूनच एकच आहे. धनगर आरक्षणाला मराठा आरक्षणामुळे धक्का लागत नाहीत, त्यामुळे इतर समाजाला धक्का लागण्याचे कारण नाही, असे जरांगे यांनी यावेळी स्पष्ट केले.




# १८ डिसेंबर अल्पसंख्यांक दिवस रोजी सर्व संबंधित कार्यालयांच्या विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत बैठक घ्यावी

बीड /प्रतिनिधी

दरवर्षी १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे अल्पसंख्यांक दिनानिमित्त बैठकीचे आयोजन करून अल्पसंख्यांक समाजाच्या विविध समस्या व त्यांच्या निवरणाविष्यी चर्चा करण्यात येते परंतु विविध संबंधित कार्यालयांचे प्रमुखांची अल्प प्रमाणात उपस्थिती मुळे समस्या मांडण्या विषयी अडचण निर्माण होते या साठी १८ डिसेंबर अल्पसंख्यांक दिवस रोजी सर्व संबंधित कार्यालयांच्या विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात यावी अशी मागणी अल्पसंख्याक हक्क परिषद तथा मार्टी कृति समिती बीड तर्फे जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे करण्यात आली आहे.

या विषयी सविस्तर असे की जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित सर्व कार्यालयांच्या विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन अल्पसंख्याक दिन शासनाच्या वतीने दरवर्षी १८ डिसेंबर रोजी शासनाच्या प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित सर्व कार्यालयांच्या विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन अल्पसंख्याक दिन साजरा करण्यात येतो. यामध्ये अल्पसंख्यांकांच्या योजनांची माहिती देणे आणि अडीअडचणी मागण्या व तक्रारी घेऊन त्याचे निवारण करण्याचे प्रयत्न शासन स्तरावर करणे वगैरे सामील आहे, असे असले तरी अल्पसंख्याक दिवशी अनेक अधिकारी बैठकीत उपस्थित राहत नाही त्यामुळे अल्पसंख्याकांनी योजनेच्या माहिती- मागण्या - अडीअडचणी कोणा समोर ठेवायचे असा प्रश्न निर्माण होतो, म्हणून दि.१८/१२/२०१३ रोजी सन्माननीय जिल्हाधिकारी सह सर्व संबंधित कार्यालयांच्या विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत अल्पसंख्याक बैठक घ्यावी अशी मागणी अल्पसंख्याक हक्क परिषद बीड तथा मार्टी कृति समिती बीड तर्फे मुजतबा अहमद खान, खुर्शीद आलम, प्रा. इल्यास इनामदार, नबील जमा, डॉ सिराज खान आरजु, प्रा. जावेद पाशा यांनी माननीय जिल्हाधिकारी बीड श्रीमती दीपा मुधोळ मुंडे यांच्या कडे निवेदना द्वारे केली आहे.

### भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे नदीम पटेल यांच्या प्रयत्नाने

# आखेर वरफळ येथील ३३ के.व्हीवर होणार गावठान फिडर

परतूर/प्रतिनिधी:-

मागील अनेक वर्षांपासून वरफळ व परिसरातील वरफळवाडी,कोरेगाव, सिरजगाव,चिंचोलीसह अन्य गावातील विजेची समस्या दिवसेंदिवस वाढत असताना तत्कालीन वरफळचे सरपंच नदीम पटेल यांनी तत्कालीन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्याकडे पत्र व्यवहार करून पाठपुरावा केला होता

याबाबत माजी मंत्री बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांनी अधीक्षक अभियंता श्री पठाण यांना बोलून वरफळ येथील ३३ के व्ही फिडर सिंगल फेज फिडर बदलून गावठाण फिडर मंजूर करण्यासाठी आवश्यक त्या बाबी पूर्ण करून मंजूर करण्याच्या सूचना दिल्या होत्या

तदनंतर दिनांक २६ सप्टेंबर २०२२ रोजी अधीक्षक अभियंता श्री पठाण यांच्या दालनात भाजपा तालुकाध्यक्ष शत्रूधन कणसे,नदीम पटेल,गजानन गोरे,गोपाल गोरे,शेख अथर, यांची विशेष बैठक बोलावून चर्चा करून प्रस्तावास मान्यते बाबत चर्चा करण्यात आली होती आणि गावठाण फिडरचा प्रस्ताव मंजुरी करिता राज्य सरकार कडे पाठवण्यात आला होता माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी सदरील प्रस्ताव उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री



देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रस्ताव मंजुर करून घेतला.

सदरील कामाचे सर्वेक्षण करण्यात आले असून येणाऱ्या काही दिवसातच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे ऊर्जा विभागाकडून सांगण्यात येत आहे.

माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर व भाजयूवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या माध्यमातून मागील चार वर्षा पासून वरफळ ३३ के व्ही फिडर चा विषय मार्गी लागावा म्हणून माझ्या सोबत गावातील व परिसरातील भाजपचे सर्वच पदाधिकारी यांनी प्रयत्न केले आणि सदरील काम आमदार बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्या माध्यमातून मंजूर करून घेतले आणि येणाऱ्या काही दिवसातच कामाला सुरुवात होणार आहे याबाबत सर्व गावकऱ्यांच्या वतीने लोणीकर साहेबांचे आभार व्यक्त करतो

मागील अनेक दिवसापासून विजेची समस्या आणि वेळोवेळी सिंगलफेजचे फेल होणारे रोहित्र यामुळे जनसामान्य नागरिकांचे हाल होत असताना माजी मंत्री बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्या माध्यमातून गावठाण फिडरच्या कामाला मंजुरी मिळाली याबाबत आमदार लोणीकर व राहुल लोणीकर यांचे आभार

गोपाल गोरे
भाजपा युवा मोर्चा

# सरकारच्या आश्वासनानंतर नैनाविरोधी उपोषण मागे

गडब/सुरेश म्हात्रे

नैना प्रकल्प विरोधात सुरु असलेले बेमुदत उपोषणामागे महाविकास आघाडी भक्कमपणे उभी राहिली. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांची बाजू मांडून सभागृहाचे लक्ष वेधून घेतले होते, सर्व आमदारांनी सभागृहात प्रश्न लावून धरल्यानंतर सत्ताधाऱ्यांकडून सभागृहातच आश्वासित करण्यात आल्यामुळे उपोषणकर्त्यांनी आपले बेमुदत उपोषण मागे घेतले.



यावेळी शिवसेना नेते अनंत गीते, उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय पाटील, नैना उपायुक्त सुकेशु पगारे, शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख बबन पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार बाळाराम पाटील, नैना समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, नारायण घरत, काँग्रेसचे आर.सी. घरत, सुदाम पाटील, शिवसेना विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, दीपक घरत, योगेश तांडेल, कॉम्रेड भूषण पाटील, प्रशांत पाटील, युवासेनेचे पराग मोहिते, शहर प्रमुख यतीन देशमुख, काशिनाथ पाटील, हेमराज म्हात्रे, अतुल म्हात्रे उपस्थित होते. माजी आमदार बाळाराम पाटील यांनी बोलताना सांगितले की, नैना विरोधी संघर्ष करीत असताना आम्ही नेहमीच मोठमोठी आंदोलने करीत आलो आहोत. मात्र अनिल ढवळे यांनी सातत्याने नैनाच्या विरोधात आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आणि ते यशस्वी देखील झाले. आणि त्यांच्या प्रत्येक आंदोलनात महिलांचा सहभाग हा त्यांच्या आंदोलनाच्या यशाचे मुख्य कारण बनले आहे. त्यामुळेच यापुढे महिलांनी आपल्या हक्कासाठी असेच पुढे राहिले पाहिजे आणि संघर्ष केला पाहिजे. नैना हटविण्याच्या मुख्य लढ्यात यापुढे शासनाला आपल्यापुढे नमविण्यासाठी आपण वज्रमूठ तयार केली आहे. असे बाळाराम पाटील म्हणाले .ज्यापद्धतीने विधिमंडळात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सभागृह गाजविले आणि नैना प्रकल्पग्रस्त उपोषणकर्त्यांच्या भावनांची कदर केली आहे. त्यामुळे मंत्र्यांना सभागृहात आश्वासन देण्याची वेळ आली. या अर्थी आपले हे उपोषण नक्कीच यशस्वी झाले आहे. येणाऱ्या काळात सरकारने नियोजित बैठकीमध्ये जर दिरंगाई केली तर मात्र सरकारला गराडा घालण्यासाठी आपल्याला सज्ज व्हावे लागेल, यासाठी आपल्याला तयारी करण्याची गरज आहे. यावेळी उपोषणकर्ते अनिल ढवळे यांनी देखील ९५ गावातील नागरिक हे न्याय न मिळाल्यास ९५ दिवस रस्त्यावर उतरून यशवंतराव चव्हाण मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग रोखण्यासाठी तयार असल्याचा इशारा देखील बाळाराम पाटील यांनी राज्य शासनाला दिला.यावेळी अनंत गीते यांनी शेतकऱ्यांची चेष्टा करणाऱ्या लोकप्रतिनिधींचा निषेध व्यक्त करीत शेतकऱ्यांच्या आंदोलनात वापरण्यात आलेल्या शिर्षकामध्ये बदल करताना राज्य सरकारने कितीही हात काढून घेण्याचा प्रयत्न केला तरी आता हे शक्य नाही, म्हणून आता शेतकऱ्यांची विजययात्रा ही राहणार आहे.



सुदर्शन आश्रम शिंदेवाडी येथे हभप सुदर्शन मुनी महाराज उदासीन यांना अभिष्टचिंतन सोहळ्याच्या शुभेच्छा देताना पत्रकार दादा पवळ .गणेश झरांडे .मल्हारी आठरे .आजिनाथ शिंदे सह आदी
(छाया दादा पवळ धामणगाव)

# अबॅकस लेवलप्रमाणे स्पर्धेत तनिष्का खांडेआणि रुद्रानी खांडे यांनी सर्वोत्कृष्ट क्रमांकाच्या रँकच्या आधारे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मिळवली संधी

बीड (प्रतिनिधी) अबॅकस तंत्राद्वारे विद्यार्थ्यांच्या मनातील गणिता विषयाची आवड निर्माण होण्याच्या उद्देशाने, बाल मनाचा खेळ पद्धतीने बौद्धिक विकास व्हावा यासाठी शहरातील अबॅकस स्टडी केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस आणि वैदिक चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. अबॅकसच्या विविध स्तरावरील ऑनलाइन स्पर्धा १० ऑक्टोबर २०२३ महिन्यामध्ये घेण्यात आले असून त्यामध्ये सर्वोत्कृष्ट रँकने तनिष्का खांडेआणि रुद्रानी खांडे यांनी अव्वल दर्जाचे स्थान प्राप्त केल्यामुळे त्यांची फेब्रुवारी २०२४ मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपकरिता निवड झालेली आहे. दहा देश तसेच भारत देशासह चार हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सहभाग असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये त्यांना संधी मिळवलीअसून बीडच्या सुपर जिनियस २० विद्यार्थ्यांनी सहभाग मिळविले आहेत. आंतरराष्ट्रीय



स्तरावरील अबॅकस प्रवेश स्पर्धेमध्ये अतिशय मानद आणि प्रतिष्ठित समजले जाणारी सर्वोत्कृष्ट रँक मिळवण्यासाठी अबॅकस स्तरावरील परीक्षा निकाल नोव्हेंबर महिन्यामध्ये लागला असून तनिष्का खांडे आणि रुद्रानी खांडे यांनी दहा मिनिटांमध्ये साठ प्रश्न सोडविण्याचा विक्रम केलेला आहे. तनिष्का खांडे आणि रुद्रानी खांडे यांनी मिळवलेल्या यशामध्ये त्यांच्या आई, वडील आणि शिक्षक यांचा सिंहाचा वाटा आहे असे त्यांनी सांगितले आहे. अबॅकस असोसिएशन तसेच अबॅकस स्टडी सेंटरचे आयोजक डॉ. एस ए घोडके यांनी तनिष्का खांडेआणि रुद्रानी खांडे मिळवलेल्या यशाचे अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

### अंजनवती येथील ग्रामस्थांशी २३ डिसेंबर मनोजजी जरांगे पाटील यांच्या

# इशारा सभेसाठी संवाद साधताना



बीड ।प्रतिनिधी

तालुक्यातील अंजनवती गावातील ग्रामस्थांना दि.२३ डिसेंबर रोजी बीड शहरातील मनोज जरांगे पाटील यांच्या इशारा सभेसाठी निमित्ताने सरसकट मराठा कुणबी आरक्षण ओबीसी प्रवर्गातुन मिळावे

या मागणीसाठी पाठिंबा देत अंजनवती ग्रामस्थांचा आज साखळी उपोषणाचा १४ वा दिवस असुन बीड शहरातील सुर्या लान्स याठिकाणी मराठा क्रांती मोर्चा आणि सकळ मराठा समाज यांनी बैठकीत घेण्यात आलेल्या सुचना आणि निर्णय संदर्भात ग्रामस्थांशी संवाद साधत सर्वांनी एकजुटीने

यावेळी आमचे सहकारी मित्र बाळासाहेब मोरे यांनी सविस्तर भुमिका मांडत सर्व मराठा समाज बांधव येतील असे आश्वासन दिले.सर्व ग्रामस्थांनी हात उंचावून सभेसाठी येण्याचे आणि सोबतीला ईतरांना आणण्याचे आश्वासन दिले.



# जाळपोळ, दगडफेक प्रकरणात आ.क्षीरसागरांची दुट्टपी भूमिका- अनिलदादा जगताप

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरात झालेल्या दगडफेक, जाळपोळ प्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांची दुट्टपी भूमिका असल्याचे आता मराठा समाजासमोर आले आहे. आ क्षीरसागर आपल्या सोयीनुसार प्रत्येक वेळेस गिरगिटाप्रमाणे रंग बदलताना दिसून येत आहेत. अधिवेशनामध्ये व यापूर्वीही मराठा आरक्षणावर ब्र शब्दही आमदारांनी काढला नाही. प्रत्येक वेळेस त्यांनी फक्त मता पुरतं मराठा समाजाचा वापर केला गेला आहे. याच्यावरूनच आमदार किती मराठा दोषी आहेत हे लक्षात येते. यामुळे मराठा समाजात संताप व्यक्त केला जात आहे. मी जाळपोळीचा समर्थन करणार नाही परंतु नाहक मराठा समाजाला गुंतवण्याचा प्रयत्न जर आमदार करत असेल तर त्यांना मराठा समाज कदापिही माफ करणार नाही कारण एसआयटी स्थापन केल्यानंतर सर्वसामान्यांना याचा नाहक त्रास होणार आहे.

३० ऑक्टोबर रोजी माजलगावसह बीडमध्ये दगडफेक, जाळपोळीची घटना घडली. यामध्ये राष्ट्रवादी कार्यालयासह क्षीरसागरांच्या घरासमोरील काही वाहने जाळण्यात आली. यावेळीही आ.संदीप क्षीरसागर यांनी पोटात एक व ओठात एक अशी भूमिका घेतली होती.

### लोकायुक्त विधेयकाला मंजुरी मिळाल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्याशी फोनवरून साधला संवाद

# लोकायुक्त विधेयक संमत केल्याबद्दल अण्णा हजारेंनी मानले मुख्यमंत्री एकनाथ शिंदेचे आभार

**नागपूर ।प्रतिनिधी**

**लोकायुक्त विधेयक आज विधान परिषदेत मंजूर झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्याशी फोनवरून संवाद साधून त्याना ही बातमी दिली. यावेळी हे विधेयक संमत केल्याबद्दल अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले.**

युपीए २ सरकारच्या कार्यकाळात देशभरात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे एकामागून एक समोर यायला लागल्याने त्याना आळा घालण्यासाठी जनलोकपाल विधेयक मंजूर करण्याची मागणी पुढे आली. हे विधेयक संसदेत मांडून ते पारित करावे या मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर आमरण उपोषण केले. अण्णांचे आंदोलन अल्पावधीतच लोकांनी उचलून धरल्याने त्याचे जनआंदोलनात रूपांतर झाले. अखेर जनतेच्या रेट्यामुळे २०१४ साली युपीए -२ सरकार कोसळले. केंद्रात लोकपाल प्रमाणेच राज्यातही लोकायुक्त विधेयक मंजूर करण्याची आग्रही मागणी त्यावेळी अण्णांनी केली होती. त्यांचे हे स्वप्न आज पूर्ण करून गेल्या अधिवेशनात हे विधेयक विधानसभेत मंजूर झाले होते. त्यानंतर आज हे विधेयक विधान परिषदेतही मंजूर करण्यात आले. हे विधेयक मंजूर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.




विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देखील या विधेयकाद्वारे लोकयुक्तांच्या कक्षेत आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः ही बातमी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना फोन करून सांगितली. यावेळी त्यांनी सध्या राज्यात अनेक आंदोलने सुरू असून तुमचे आंदोलन आम्हाला परवडले नसते त्यामुळे आम्ही लोकयुक्त विधेयक मंजूर केल्याचे सांगितले. यावर अण्णांनी समाधान व्यक्त करत तुमच्या कारकिर्दीत हे विधेयक तुम्ही संमत करून घेतलेत याचा विशेष आनंद होत असल्याचे मत व्यक्त केले. हे विधेयक मंजूर झाल्यामुळे सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळेल, भ्रष्टाचाराला आळा बसेल असेही त्यांनी सांगितले. काही जणांचा हे विधेयक मांडण्याला विरोध होता मात्र अण्णा जे काही सांगतील सुचवतील ते सर्वसामान्य लोकांच्या भल्याचेच असेल याची खात्री पटल्याने या विधेयकाच्या मार्गातील सगळे अडथळे बाजूला करून ते संमत केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी अण्णांना सांगितले. तसेच राज्यातील महायुती सरकारला यापुढे देखील आपल्या मार्गदर्शनाची गरज असून त्यासाठी तब्येतीची काळजी घ्यावी असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी अण्णा हजारे यांना सांगितले.




अंबाजोगाई : देशमुख परिवाराच्या विवाह प्रसंगी उपस्थित राहून शुभेच्छा देताना अक्षय भैय्या मुंदडा, ऋषिकेश भैया आडसकर व इतर मान्यवर.

# श्रीमती गो. कुं.यो.कन्या विद्यालयात माजी विद्यार्थीनी मेळावा

अंबाजोगाई : योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात बुधवार ०३ जानेवारी रोजी माजी विद्यार्थिनींचा मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका एम.एस. कुलकर्णी,संयोजन समितीच्या वतीने जे.के. चव्हाण,एस.एन.धावडकर यांनी दिली. श्रीमती गो.कुं.यो.कन्या विद्यालयाचे एकच ध्येय आहे की,आतापर्यंत बाहेर पडलेल्या विद्यालयातील विद्यार्थीनींना पुन्हा एकदा आपल्या जुन्या मैत्रिणी,शिक्षिका, शिक्षक यांना भेटणे एकमेकांचे कुशलक्षेम विचारणे. आपण समाजातील काही देणे लागतो. आपण शिकलो पण येणाऱ्या पिढीसाठी काही करता येईल का? म्हणून सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून ०३ जानेवारी बुधवारी माजी विद्यार्थिनी मेळावा आयोजित केला असून माजी विद्यार्थीनींनी मेळाव्या बाबतच्या अधिक माहितीसाठी ९४२२०६९६८३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा व मेळाव्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



आदरणीय एच आर घोडके साहेब (अंबेजोगाई ) यांची P.S.I. म्हणून पदोन्नती झाल्या बद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना अमित जाजु राणा चव्हाण राजेश वाहुळे ताहेर शेख अशोक काळे.

# मनोज जरांगे यांची सभा यशस्वी करणाऱ्या मावळ्यांचे सकल मराठा बांधवातून होतेय कौतूक

## पंधरा दिवसापासून अहोरात्र झटणारे, आयोजक,संयोजक तसेच इतर मेहनत घेणारे सच्चे मावळे सुनिल देशमुख, मुकुंद कणसे,कुलदिप करपे यांचे कौतूक

केज/प्रतिनिधी

मराठा समाजाचे क्रांती सुर्य,मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांची आरक्षणाच्या लढाई साठी बोरी सावरगाव येथे आयोजीत केलेली प्रचंड जाहिर सभा यशस्वी झाली.मराठा योद्धा जरांगे पाटील यांची मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठा समाज बांधव जनजागृती करण्यासाठी बारा डिसेंबर रोजी बोरी सावरगाव तालुका केज येथे मराठा आरक्षण जनजागृती सभा आयोजीत केली होती या सभेसाठी संपूर्ण पंच क्रोशीतील मराठा समाज बांधवानी आपले एकी, एकजुट दाखवून शासनाला जागे करण्या साठी मराठा समाज बांधवांनी जागृत होणे गरजेचे आहे.त्यासाठी मराठा योध्दा जरांगे



पाटील यांच्या मागे मजबूतपणे मराठा समाजाची ताकत दाखवून आपल्या लेकरांसाठी, त्यांच्या भविष्यासाठी सरकारने आरक्षण द्यावे यासाठी मराठा योध्दा जरांगे पाटील यांची आपल्या ग्रामीणभागातील मराठा समाज जागृत व्हावा म्हणून घेतलेली ही सभा व त्यासाठीअहोरात्र, रात्रंदिवस झटणारे सच्चे मावळे बोरीसावरगावचे माजी सरपंच सुनिल देशमूख,मुकुंद कणसे यांसारख्या अनेक मावळ्यांनी रात्रीचा दिवस करून सभेसाठी लागणारे सर्व नियोजन अगदी उत्कृष्ट रित्या पार पाडले, सभेसाठी येणाऱ्या समाज बांधवासाठी,नाष्टा,पाणी, वाहन व्यवस्था,बसण्या साठीआसन व्यवस्था, महीलांसाठी व्यवस्था, आकर्षक आणी प्रचंड असे स्टेज,विद्यूतरोषणाई, साउंड सिस्टम,पत्रकार, प्रसारमाध्यमांची व्यवस्था, ठिकठिकाणी बॅनर,सुचना फलक,सभेचेठिकाणाकडे जाण्यासाठी दिशादर्शक फलक,आदी बाबींचे यथायोग्य नियोजन करून मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांची सभा शांततेत पारपाडल्याबद्दल बोरीसावरगावचे सरपंच सुनिल देशमुख,मुकुंद कणसे,कुलदिप करपे यांचे आणी मेहनत घेवून आपल्या योध्याची सभा यशस्वी केल्याबद्दल केज तालुक्यातील मराठा समाज बांधवातून या सर्व सच्चा मावळ्यांचे कौतूक व अभिनंदन केले जात आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या युवक तालुकाध्यक्षपदी कैलास चाळक यांची नियुक्ती

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील लहुरी येथील रहिवासी कैलास चाळक यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचीदखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या केज तालुका युवक तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.याविषयी सविस्तर वृत्त असेकी,केजतालुक्यातील लहुरी येथील रहिवासी व सामाजिक व राजकीय क्षेत्रात अविरत कार्यरत असलेले धडाडीचे कार्यकर्ते कैलास चाळक यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री. जयंतराव पाटील व बीड जिल्हाध्यक्ष श्री.संदिप क्षीरसागर,महेबुब भाई शेख व माजी आमदार श्री.पृथ्वीराज साठे यांच्या मान्यतेने व माजीमंत्री श्री. जयसिंगराव गायकवाड यांच्या हस्ते केज तालुका युवक तालुकाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख खा.श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्याविकासात आपण भरीव कार्य करणार व पक्ष संघटना मजबुतीने उभी करणार असल्याचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष कैलास चाळक यांनी यावेळी मत व्यक्त केले.या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी माजी मंत्री जयसिंगराव गायकवाड, माजी आमदार पृथ्वीराज साठे,तालुका अध्यक्ष शंकर जाधव,महिला आघाडी तालुकाध्यक्षा तस्लीमा शेख,युवराज मगर,गव्हाणे साहेब, इनामदार,जाधव साहेब, पदम पाटील,दत्ता चाळक, सामाजिक न्याय केज तालुका अध्यक्ष अक्षय मुजमुले व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कासारी येथे तरुणाची आत्महत्या करुणा मुंढे नि बडे परिवाराचे सांत्वन केले

धारूर ।प्रतिनिधी

तालुक्यामध्ये कासारी बोडखा या गावात लक्ष्मण माणिक बडे या शेतकरी नवतरुणाने आत्महत्या केली असे समजताच स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ.करणा धनंजय मुंडे सांत्वनपर भेट दिली भेट दिला दिल्यानंतर गावामध्ये असलेलं विदारक दुःख सर्वांच्या समोर आलं एखाद्या घरातला करता पुरुष गेल्यानंतर त्याच्या मागे कुटुंब उघड्यावर ती पडलेलं नजरेस भावलं त्यांच्या पश्चात त्यांना दोन मुलं एक आई आणि पत्नी असा उघड्यावर पडलेला पांढरा परिवार नजरेस आला या विदारक दुःखाला कारणीभूत कोण दोन एकर माळरान जमीनीवर या परिवारांना जगायचं कसं हा प्रश्न पडला आणि खऱ्या अर्थानं करूणा दाखवत आमच्या स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष करुणा मुंडे यांनी या परिवाराला पाच हजाराची मदत करीत केली., तसेच मयत मुलाच्या आईने तलाठी कार्यालयास वारंवार चकरा मारूनही काहीच ना काहीच काम न करणाऱ्या अकार्यक्षम तलाठी आलूरे मॅडमला तात्काळ फोन लावला आणि फेरफार चे त्यांचे काम केले आणि विशेष म्हणजे अशाच कुणाच्या घरात महाराष्ट्रात भरपूर लोकांना घरकुल योजनेचा लाभ भेटला नाही गाव सोडून शेतात राहणाऱ्या लोकांना शेतीचा पिक विमा ही भेटला नाही त्यामुळे गरिबांचा वाली कोण? हा प्रश्न व्यवस्थेला पडलेला आहे त्यामुळे हा प्रश्न करुणा मुंडेंनी स्वतःच्या फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेसमोर ठेवलेला आहे आणि असे आवाहन केले सरळ



हाताने या परिवाराला या तालुक्यातील आणि या जिल्ह्यातील राजकीय व्यावसायिक आणि प्रशासकीय लोकांनीही सढळ हाताने मदत करावी आणि या कुटुंबाचे पुनर्वसन करावं राष्ट्रवादी काँग्रेसचे धारूरचे तालुकाध्यक्ष प्रशांत बडे तसेच कासारी बोडखा गावातील समस्त गावकरी उपस्थित होते.

# निमगाव चोभा ग्रामपंचायतीमध्ये वर्षभरातच विविध कामांचा धडाका!

## सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सरपंच प्रयत्नशील

आष्टी ।प्रतिनिधी

केंद्र आणि राज्य सरकारने जनसामान्यांसाठी तयार केलेल्या विविध योजना ग्रामपातळीवर लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सरकारकडून योजना जाहीर होतात. मात्र, त्या योजना लोकांपर्यंत पोहोचण्यास उशीर होतो. त्यामुळे ग्राउंड लेव्हलवर काम करणं अतिशय महत्त्वाचं असतं. निमगांव चोभा गावच्या सरपंच भाग्यश्री गाडे आणि कानिफनाथ ग्राम विकास पॅनलचे प्रमुख तथा उपसरपंच विजय शेळके यांनी वर्षभरातच विविध कामांचा धडाका लावला आहे.

डिसेंबर २०२२ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदा ग्रामपंचायत कार्यालयाचा कायापालट केला. वर्षभरात विविध विकास कामं आणि गावातील लोकांना योजना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. गावात भूमिगत नाली आणि पिण्याच्या पाण्याची चिलिंग व फिल्टरची क्षमता वाढवण्यात आली आहे. हरिजन वस्तीमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचले आहे.

फिल्टरच्या पाण्यासाठी स्वतंत्र बोअर घेण्यात आला आहे. स्मशानभूमी मध्ये सुशोभीकरण, पेविंग ब्लॉक बसवले आहेत. गावात विविध प्रजातींच्या झाडांची लागवड केली आहे आणि त्या झाडांना ठिबक सिंचन करण्यात आले आहे. निमगाव चोभा जिल्हा परिषद शाळेसाठी एका खोलीचे बांधकाम ग्रामपंचायतने केले आहे. तसेच ग्रामपंचायतमधील विजेच्या व्यवस्थेसाठी सोलर बसवण्यात आले आहे. गावातील जगदंबा वस्तीवर नवीन पाईपलाईन केली आहे.

पुढील चार वर्षांमध्ये आम्ही गावच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. काही बोलून दाखवण्यापेक्षा लोकांची काम करून जास्तीत जास्त विकास करण्याचा सर्वांचा संकल्प आहे.

विजय शेळके, उपसरपंच, निमगांव चोभा.




माळेगाव ता कैज श्री. मस्के व श्री. कदम यांच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहुन शुभेच्छा देताना श्री. नमिताताई अक्षय मुंदडा, श्री ऋषकेश भैया आडसकर व ईतर मान्यवर.

# पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा लाभ पाटोदा तालुक्यातील जनतेने घ्यावा -नगरसेवक सय्यद आबुशेठ

पाटोदा (दत्ता वाघमारे)

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना ही आठरा प्रकारच्या पारंपरिक कारागिरांना व्यवसायासाठी आर्थिक मदत व प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाद्वारे ही योजना सुरु करण्यात आली आहे.योजनेअंतर्गत व्यवसाय सुरु करण्यासाठी अठरा प्रकारच्या पारंपरिक कारागिरांना पाच टक्के व्याजदरासह पहिल्या टप्प्यात एक लाख रु. तर दुसऱ्या टप्प्यात दोन लाख रु. चे कर्ज उपलब्ध करून दिल जाणार आहे.१. पोर्टल वरती नोंदणी करणाऱ्या १८ प्रकारच्या पारंपरिक कारागिरांना पाच आणि पंधरा दिवसीय प्रशिक्षण दिले जाणार आहे२. पाच दिवसीय बेसिक प्रशिक्षण व पंधरा दिवसीय पूर्ण प्रशिक्षण कालावधीत रु. ५०० (रोज) विद्यावेतन दिले जाणार आहे ३. प्रशिक्षणानंतर पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र तसेच आयडी कार्ड प्रदान केले जाणार आहे ४. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कारागिरांना टूल किट खरेदीसाठी १५ हजार रुपये चे ई



व्हाउचर. ५. प्रशिक्षण घेणाऱ्या करगिरास व्यवसाय सुरु करण्यासाठी ५% व्याजदरासह पहिल्या टप्प्यात एक लाख तर दुसऱ्या टप्प्यात २ लाख रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिल जाणार आहे. ह्या योजनेचा लाभ सुतार लोहार, सोनार (दागिने कारा) कुंभार , न्हावी , माळी (फुल कारागीर),धोबी शिंपी , गवंडी, चर्मकार, अस्त्रकार,बोट बांधणारे अवजारे बनवणारे, खेळणी बनवणारे,कुलूप बनवणारे विणकर कामगार, ह्या योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे १. आधार कार्ड २. बँक पासबुक ३. मोबाईल नंबर घेऊन आदर्श जाहिरात कंपनी कोर्ट रोड पाटोदा किंवा तुमच्या जवळील ऑनलाइन सेवा सुविधा देणारे केंद्र मध्ये संपर्क करा आशे आवाहन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी केले आहे.



# माहूर येथील विशेष पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राज्यभरातून पत्रकार येणार एस.एम.देशमुख यांची माहिती


## मराठी पत्रकार परिषदेच्या बैठकीत विविध विषयांवर झाले विचारमंथन

मुंबई ।प्रतिनिधी

'मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारे वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कारांचे वितरण सोहळा येत्या १३ जानेवारी २०२४ रोजी नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागातून मोठ्या संख्येने पत्रकार येणार आहेत. त्यादृष्टीने नांदेड व माहूर येथील मराठी पत्रकार परिषदेची टीम नियोजन करीत आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे जोरदार तयारी सुरू असून तो नक्कीच यशस्वी होईल,' असा विश्वास परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केला.

मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा प्रसिद्धी प्रमुखांची ऑनलाईन बैठक झाली. राज्यातील ३५ जिल्हा प्रसिद्धी प्रमुखांपैकी ३० जिल्ह्यातील प्रतिनिधी बैठकीस हजर होते. या बैठकीत मार्गदर्शन करताना देशमुख बोलत होते. बैठकीला विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस मन्सूरभाई शेख, कोषाध्यक्ष विजय जोशी, परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, राज्याचे प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहाय्यक प्रसिद्धी प्रमुख भरत निगडे, भाऊसाहेब सकट (जि.कोल्हापूर), गजानन वाघ (वाशीम), विजय घरत (जि.पालघर), कमलेश ठाकूर ( जि.रायगड), जमिर खलपे (जि. रत्नागीरी), गोपीभाऊ लांडगे (धुळे), संजय हांगे (बीड ), सुनील वाघमारे (छत्रपती संभाजीनगर), सुभाष राऊत (नागपूर ), यशवंत थोटे (गोंदीया ), राम साळुंके (लातूर), बबलू दोडके (अमरावती), अहमदनगर जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके, उत्तर नगर जिल्हाध्यक्ष अमोल वैद्य, नांदेड जिल्हाध्यक्ष गोवर्धन बियाणी, डॉ. बबन मेश्राम, ईश्वर माहत्रे, साजिद खान, संजय साळुंके, सरफरोज दोसानी, दिगंबर गायकवाड (नांदेड) आदी उपस्थित होते.

'मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांना पुरस्कार देऊन राज्यपातळीवर त्यांचा गौरव केला जातो. हे सोहळे जाणीवपूर्वक ग्रामीण भागात आणि राज्याच्या विविध विभागात घेतले जातात. २०२२ चा पुरस्कार वितरण सोहळा नगर जिल्ह्यात कर्जत येथे घेण्यात आला होता. अतिशय भव्य दिव्य असा तो सोहळा झाला होता. त्या अगोदर नागपूर, पाटण, पालघर, वडवणी, अक्कलकोट आदी ठिकाणी हे सोहळे घेतले गेले होते. २०२३ चे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले आहेत. माहूर, माजलगाव, तेल्हारा, अंबरनाथ, आर्वी, बत्तीस शिराळा, साक्री, आणि शिरूर तालुका पत्रकार संघांना तसेच दक्षिण आणि उत्तर नगर जिल्ह्यांना हे पुरस्कार घोषित झाले आहेत. नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे १३ जानेवारी २०२४ रोजी एका शानदार सोहळ्यात हे पुरस्कार वितरित केले जाणार आहेत. माहूर हे साडेतीन शक्तीपीठा पैकी आद्य पीठ आहे. येथे रेणुका मातेचं मंदीर असून हे तीर्थक्षेत्र देशभर प्रसिध्द आहे. मुंबईहून किनवटपर्यंत



रेल्वे सेवा उपलब्ध आहे. किनवट येथून एका तासात आपण माहूरला पोहचू शकतो. पुणे येथून नांदेडसाठी रेल्वे सेवा उपलब्ध आहे. नांदेड येथून रस्ता मार्गे पुढे माहूरला जाता येईल. नांदेड, विदर्भातून यवतमाळ, वर्धा, अकोला आदी ठिकाणाहून माहूरसाठी बस सेवा उपलब्ध आहे. नांदेडहून माहूरला जाण्यासाठी रस्ता मार्गे अडीच ते तीन तास लागतात. माहूरचा हा पुरस्कार वितरण कार्यक्रम परिषदेच्या परंपरेला साजेसा असाच होणार आहे. राज्यभरातून पत्रकार या कार्यक्रमासाठी येतील,' असेही देशमुख यांनी सांगितले.

तर, यावेळी विश्वस्त किरण नाईक यांनी सांगितले की, 'मराठी पत्रकार परिषदेचे आतापर्यंतची वाटचाल ही खूपच महत्त्वपूर्ण आहे. माहूर येथील पुरस्कार वितरण सोहळा खूपच चांगला होईल, असा आह्मा सर्वांना विश्वास आहे. लवकरच यासाठी विभागीय सचिव व राज्यातील उपाध्यक्ष यांची बैठक घेतली जाईल.' बैठकीत प्रास्ताविक करताना अध्यक्ष शरद पाबळे यांनी मागील जिल्हा प्रसिद्धी प्रमुख यांच्या बैठकीचा आढावा सांगितला. तसेच पुरस्कार प्राप्त जिल्हा तालुका संघांनी त्यांनी वर्षभर केलेल्या कामाची माहिती दोन दिवसात पाठवावी, जेणेकरून त्यावर आधारित एक प्रेझेंटेशन तयार करता येईल. तसेच माहूर येथील कार्यक्रमात दाखवण्यासाठी डॉक्युमेंटरीही तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे स्वरूप कसे असावे, याबाबत महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. परिषदेचे सरचिटणीस मन्सूरभाई शेख यांनी नांदेड व माहूरच्या टीमला कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कोषाध्यक्ष विजय जोशी यांनी पुरस्कार वितरण सोहळ्याची तयारी कशा पद्धतीने सुरू आहे, याची माहिती दिली. पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे नांदेड व माहूर येथील आयोजकांनी आत्तापर्यंत झालेल्या कार्यक्रमाच्या तयारीची माहिती देतानाच १३ जानेवारीच्या कार्यक्रमाचे कशा पद्धतीने नियोजन करण्यात आले आहे, हे सांगितले. अहमदनगरचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके यांनी नगर जिल्ह्याला पुरस्कार दिल्याबद्दल सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले, व नगर जिल्ह्याने गेल्या वर्षभर केलेल्या कामाची माहिती दिली. यावेळी जिल्हा प्रसिद्धीप्रमुखांनी विविध विषयांवर आपली भूमिका मांडली. राज्य प्रसिद्धी प्रमुख संदीप कुलकर्णी यांनी आभार मानले. या वर्षीच्या पुरस्कारांचे मानकरी पुढील प्रमाणे आहेत रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार यंदा उत्तरनगर आणि दक्षिणनगर जिल्ह्यांना विभागून देण्यात आला आहे. वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार १) मराठवाडा विभाग : माजलगाव तालुका पत्रकार संघ, जिल्हा बीड २) लातूर विभाग : माहूर तालुका पत्रकार संघ, जिल्हा नांदेड ३) नाशिक विभाग : साक्री तालुका मराठी पत्रकार संघ, जिल्हा धुळे ४) पुणे विभाग : शिरूर तालुका मराठी पत्रकार संघ, जिल्हा पुणे ५) अमरावती विभाग : तेल्हारा तालुका पत्रकार संघ, जिल्हा अकोला ६) कोल्हापूर विभाग : बत्तीस शिराळा तालुका पत्रकार संघ, जिल्हा सांगली ७) नागपूर विभाग : आर्वी तालुका पत्रकार संघ, जिल्हा वर्धा ८) कोकण विभाग : अंबरनाथ तालुका पत्रकार संघ, जिल्हा ठाणे.

# निमगाव चोभा ग्रामपंचायतीमध्ये वर्षभरातच विविध कामांचा धडाका!

## सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सरपंच प्रयत्नशील

आष्टी ।किरण जावळे

केंद्र आणि राज्य सरकारने जनसामान्यांसाठी तयार केलेल्या विविध योजना ग्रामपातळीवर लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सरकारकडून योजना जाहीर होतात. मात्र, त्या योजना लोकांपर्यंत पोहोचण्यास उशीर होतो. त्यामुळे ग्राउंड लेव्हलवर काम करणं अतिशय महत्त्वाचं असतं. निमगांव चोभा गावच्या सरपंच भाग्यश्री गाडे आणि कानिफनाथ ग्राम विकास पॅनलचे प्रमुख तथा उपसरपंच विजय शेळके यांनी वर्षभरातच विविध कामांचा धडाका लावला आहे.

डिसेंबर २०२२ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदा ग्रामपंचायत कार्यालयाचा कायापालट केला. वर्षभरात विविध विकास कामं आणि गावातील लोकांना योजना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. गावात भूमिगत नाली आणि पिण्याच्या पाण्याची चिलिंग व फिल्टरची क्षमता




वाढवण्यात आली आहे. हरिजन वस्तीमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचले आहे.

फिल्टरच्या पाण्यासाठी स्वतंत्र बोअर घेण्यात आला आहे. स्मशानभूमी मध्ये सुशोभीकरण, पेविंग ब्लॉक बसवले आहेत. गावात विविध प्रजातींच्या झाडांची लागवड केली आहे आणि त्या झाडांना ठिबक सिंचन करण्यात आले आहे. निमगाव चोभा जिल्हा परिषद शाळेसाठी एका खोलीचे बांधकाम ग्रामपंचायतने केले आहे. तसेच ग्रामपंचायतमधील विजेच्या व्यवस्थेसाठी सोलर बसवण्यात आले आहे. गावातील जगदंबा वस्तीवर नवीन पाईपलाईन केली आहे.

पुढील चार वर्षांमध्ये आम्ही गावच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. काही बोलून दाखवण्यापेक्षा लोकांची काम करून जास्तीत जास्त विकास करण्याचा सर्वांचा संकल्प आहे.

विजय शेळके, उपसरपंच, निमगांव चोभा.

# बीड व धाराशिव लोकसभा प्रभारी पदी विनोद जाधव यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष दिलीप भाऊ कांबळे यांनी येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेऊन अनुसुचित जाती मोर्चाची टीम तयार केली आहे. प्रदेश पदाधिकारी यांना प्रत्येक जिल्ह्यात लोकसभा संयोजक प्रभारी यांची नियुक्ती केली आहें. यात औसा येथित रहिवाशी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश मीडिया प्रमुख विनोद जाधव यांची बीड व धाराशिव लोकसभा प्रभारी पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्धल त्यांनी



प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर । बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष दिलीप भाऊ कांबळे. आ. अभिमन्यू पवार यांचे आभार व्यक्त केले. पक्षाने माझ्यावर विश्वास ठेऊन मला दिलेली जवाबदारी पक्ष संघटनात्मक बांधणी पूर्ण पणे पार पाडीन अशी ग्वाही विनोद जाधव यांनी नियुक्ती पन स्विकारताना दिली.




बीड तालुक्यातील अंजनवती गावातील ग्रामस्थांना दि.२३ डिसेंबर रोजी बीड शहरातील मनोज जरांगे पाटील यांच्या इशारा सभेसाठी निमित्ताने सरसकट मराठा कुणबी आरक्षण ओबीसी प्रवर्गातुन मिळावे या मागणीसाठी पाठिंबा देत अंजनवती ग्रामस्थांचा आज साखळी उपोषणाचा १४ वा दिवस असुन बीड शहरातील सुर्या लान्स याठिकाणी मराठा क्रांती मोर्चा आणि सकळ मराठा समाज यांनी बैठकीत घेण्यात आलेल्या सुचना आणि निर्णय संदर्भात ग्रामस्थांशी संवाद साधत सर्वांनी एकजुटीने यावेळी आमचे सहकारी मित्र बाळासाहेब मोरे यांनी सविस्तर भुमिका मांडत सर्व मराठा समाज बांधव येतील असे आश्वासन दिले.सर्व ग्रामस्थांनी हात उंचावून सभेसाठी येण्याचे आणि सोबतीला ईतरांना आणण्याचे आश्वासन दिले.

# माजी सैनिकांच्या कार्यालयासाठी जागा देणार-रोहिदास पाटील गाडेकर

## शिरूर येथे ऑपरेशन विजय दिन साजरा

शिरूर ।प्रशांत बाफना

भारतमातेच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या आजी माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शहरात एकता शक्ती संघटनेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या कार्यालयासाठी जागा देणार असल्याचे प्रतिपादन प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांनी केले.ते शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात आयोजीत केलेल्या ऑपरेशन विजय दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.या वेळी व्यासपीठावर एकता शक्ती संघटनेचे तालुकाध्यक्ष खेडकर यांच्यासह माजी सैनिक अशोक गिरी,नायब तहसीलदार बाळासाहेब खेडकर, सहपोलीस निरीक्षक गणेश धोकरट,जि.प.सदस्य शिवाजी पवार,नगरसेवक अर्जुन गाडेकर, डॉक्टर्स अँड मेडिकल असोसिएशनचे डॉ.आर.एस. बडजाते यांची उपस्थिती होती.भारत पाकिस्तान दरम्यान १९७१



साली झालेल्या युद्धात पाकिस्तानचे सैन्य शरण आल्याबद्दल १६ डिसेंबर हा दिवस ऑपरेशन विजय दिन म्हणुन साजरा केला जातो.त्या निमित्त शहरात प्रथमच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी दहा वाजता प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ असलेल्या एकता शक्ती संघटनेच्या कार्यालयापासुन माजी सैनिकांनी मोटारसायकलवर तिरंगा ध्वज लावून भव्य रॅली काढली होती.या रॅलीचे छत्रपती संभाजी राजे चौकात आगमन झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विजयी स्तंभाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात सहभागी झालेल्या माजी सैनिक अशोक गिरी यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला माजी सैनिक वसंत खेडकर,सुखदेव केदार,रियाज पठान,पांडुरंग मिसाळ,महादेव पवार,पांडुरंग पाखरे,अनिल सानप,बी.डी.गर्कळ,सदाशिव शेळके,तुकाराम खताळ,बापूराव शिंदे,श्रीमंत सानप,अजिनाथ आंधळे,प्रकाश भांडेकर आदींसह पत्रकार विजयकुमार गाडेकर,बबनराव देशमुख,सतिश मुरकुटे,अंगद पानसंबळ,भारत पानसंबळ यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने करिअर मार्गदर्शन शिबिर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षेची तयारी आणि विविध क्षेत्रातील करियर संदर्भात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील नामवंत आणि प्रतिष्ठित असणाऱ्या युनिक अकॅडमी पुणे येथील प्रेरणादायी वक्त्यांचे मार्गदर्शन मिळावे, या हेतूने आ. नमिता मुंदडा, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान अंबाजोगाई व युनिक अकॅडमी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

करिअर मार्गदर्शन शिबिरामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या विविध क्लासेसचे विद्यार्थी दहावी उत्तीर्ण विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, इन सर्विस परीक्षेची तयारी करत असलेले विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक सर्व पालक या सर्वांनी उपस्थित रहावे, यासाठी सर्वांनाच आवाहन करण्यात आले आहे. मंगळवार १९ डिसेंबर रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह याठिकाणी संपन्न होणाऱ्या करियर मार्गदर्शन शिबिरामध्ये युनिक अकॅडमी पुण्याचे सुप्रसिद्ध करियर मार्गदर्शक प्रेरणादायी वक्ते प्राध्यापक दिनेश ताठे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून यासोबतच युनिक अकॅडमी पुणेचे समन्वयक प्राध्यापक चंद्रकांत खराटे, समुपदेशक प्राध्यापक मारुती निर्मळ यांचीही उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमस्थळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी युनिक अकॅडमी पुणे यांच्या प्रकाशन संस्थेची एमपीएससी यूपीएससी अभ्यासक्रमाची पुस्तके अत्यंत सवलतीच्या दरामध्ये विद्यार्थ्यांना मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार उपलब्ध असणार आहेत. वसुंधरा सेवा प्रतिष्ठान अंबाजोगाईच्या वतीने केज मतदारसंघातील विद्यार्थी व युवकांसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. सातत्याने युवकांसाठी वसुंधरा सेवा प्रतिष्ठान कार्यरत असणार आहे. विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी बाबत मार्गदर्शन करण्यासाठी वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने या भव्य मोफत करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. याचा लाभ मतदार संघातील सर्व विद्यार्थी पालक यांनी घ्यावा, असे आवाहन आ. नमिता मुंदडा, नंदकिशोर मुंदडा, अक्षय मुंदडा, कृष्णा लोमटे, महेश आंबाड सर्व सदस्य वसुंधरा सेवा प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.



आजाद समाज पार्टी कांशीराम चे बीड जिल्हाध्यक्ष आशिष कुमार चव्हाण यांच्या मुलींचा अनया अधिरा यांचा सातवा वाढदिवस जिव्हाळा वृद्धाश्रम बीड येथे अन्नदान व साडी वाटप करून साजरा करण्यात आला या वेळी घरचे सदस्य तथा सहकारी कुणाल बोराडे, राहुल माटे, अतिक पटेल बबलू वंजारे आदी उपस्तित होते



श्री.शाम साळवे यांची ऑल इंडिया पँथर सेनेचे जालना जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली यावेळी नियुक्ती पत्र देताना राष्ट्रीय अध्यक्ष मा दिपक भाई केदार आणि मराठवाडा अध्यक्ष मा बंटी भाऊ सदावर्ते यांच्या हस्ते नियुक्ती करण्यात आली यावेळी उपस्थित संदिप उघडे, लक्ष्मण भंडागे, दत्ता शिंदे अशोक निंबाळकर आदी उपस्थित होते....!

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT